चुकविलेल्या मुद्रांक शुल्काचा शोध घेण्याकरिता
बक्षिस योजना बंद करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : मुद्रांक २००१/३०७/प्र.क्र.१६०/म-१ मंत्रालय मुंबई ४०० ०३२
दिनांक - ३ ऑगस्ट,२००९

वाचा : १. शासन निर्णय क्रमांक मुदांक २००१/३०७/प्र.क्र.१६०/म-१
दि.२८.०६.२००४
२. शासन निर्णय क्रमांक : मुदांक २००१/३०७/प्र.क्र.१६०/म-१
दि.२८.०६.२००४

**शासन निर्णय :**

नागरी प्रभाव क्षेत्रामध्ये स्थावर मालमत्तेच्या किंमती जास्त असल्यामुळे मुद्रांक शुल्क चुकविण्याकडे संबंधीचा कल असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले होते. ही बाब ग्रामीण भागात जरी दिसून येत नव्हती. शहरी भाग प्रभाग क्षेत्रात व जेथे बिनशेती क्षमा (N.A.) असलेल्या क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणात आढळून येत होती. अशा प्रकारच्या मुद्रांक शुल्क चुकविलेल्या प्रकरणाचा मोठया प्रमाणावर शोध घेणे अनिवार्य झाले होते. ज्या दस्तावर मुद्रांक शुल्क चुकविण्यात आले आहे तेथे यथझेचीतरित्या मुदांक शुल्काची तो वसुल करण्यासाठी शासनाकडून उपाययोजना केल्या जातात. त्याचाच एक भाग म्हणून चुकविलेल्या मुद्रांक शुल्काची माहिती देणा-यास " बक्षिस योजना " महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक मुद्रांक २००१/३०७/प्र.क्र.१६०/म-१ दिनांक २८ जून,२००४ नुसार शासनाने जाहीर केली होती.

या बक्षिस योजनेस शासन निर्णय २००१/३०७/प्र.क्र.१६०/म-१ दि. ३ फेब्रुवारी,२००९ अन्वये स्थगिती देण्यात आली आहे. ही योजना जाहीर करुन आता पाच वर्षाचा कालावधी उलटून गेला असून त्या दरम्यानच्या कालावधीत निरनिराळया दस्तावरील थकीत मुद्रांक भरण्यासाठी शासनाने सन २००४, २००८ मध्ये अभय योजना जाहीर केली होती. या अभय योजनेचा जनतेकडून चांगला प्रतिसाद मिळाला असून त्यामध्ये लाखो दस्तावरुन थकीत मुद्राक शुल्काचा भरणा झाला आहे. त्यामुळे आता चुकविलेल्या मुद्रांक शुल्काबाबतची फार कमी प्रकरणे शिल्लक असल्याची शक्यता असून प्रकरणाचा शोध लावण्याचा काम सध्या उपलब्ध असलेल्या यंत्रणेद्वारे घेणे शक्य आहे अशी शासनाची धारणा झाली आहे.

D:\Nagwekar-2009\LETTER Govt.GR R

जिल्हाधिकारी रत्नागिरी
शाखा
आवक नं. RB 30669
का. नं.:-2
20 AUG 2009
तहसिलदार उप जिल्हाधिकारी जिल्हाधिकारी
25 AUG 2009

तथापि, सदर योजनेअंतर्गत मुळतः चुकविलेल्या मुद्रांक शुल्काचा शोध घेण्याकरिता योजना अंमलात आणली होती. या बक्षिस योजनेअंतर्गत बक्षीस मिळविण्यासाठी काही ठरावकि व्यक्ती माहितीच्या अधिकाराखाली माहिती प्राप्त करुन त्याच्या आधारे वेगवेगळे अर्ज करुन अर्ज दाखल करुन बक्षिससाठी अर्ज करावा अशाप्रकारे या योजनेअंतर्गत केवळ विशिष्ट व्यक्ती या योजनेचा फायदा घेत असल्याचे निदर्शनास आले आहे. सबब योजनेचा फेर विचार करुन शासन या निर्णयाद्वारे चुकविलेल्या मुद्रांक शुल्काचा शोध घेण्याबाबतची "बक्षिस योजना बंद करण्यात येत असून याबाबतची बक्षिस योजनेची प्रलंबीत प्रकरणे असतील तेवढी दप्तर दाखल करण्यात यावीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(प्रदिप सं.इंदुलकर)
उप सचिव
महसूल व वन विभाग

प्रति,

नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रतिलिपी :-

- महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
- महालेखापाल, (लेखा परिक्षा), १ / २ , महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
- सर्व विभागीय आयुक्त,
- सर्व जिल्हाधिकारी,
- अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई/मुद्रांक अधिक्षक, पुणे
- संचालक, नगररचना, पुणे.
- सहसंचालक (मुल्यांकन), पुणे
- सर्व नोंदणी उपमहानिरिक्षक व मुद्रांक उपनियंत्रक
- उपसंचालक, नगररचना (मुल्यांकन), मुंबई
- सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी/सर्व सह जिल्हा निबंधक वर्ग-१
- सहा.संचालक, नगर रचना (मुल्यांकन), मुंबई
- सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी/सर्व सह जिल्हा निबंधक वर्ग-१
- सहाय्यक संचालक, नगररचना (मुल्यांकन) ठाणे/पुणे/नाशिक/औरंगाबाद/
- नागपूर/कोंकण/अमरावती
- निवड नस्ती म-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई



क्र.मशा/कार्या-१७/२००९
जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी दि. ५/९/०९

अनौपचारिक संदर्भाने कुळकायदा शाखेकडे वर्ग.

३२३५१

४ सितम्बर 2009

जिल्हाधिकारी रत्नागिरी करिता